स्वायत्त संस्थांत नवीन व्यवस्थापन मंडळाची (BOG) स्थापन करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१३/(१२९/१३)/तांशि-२**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ सप्टेंबर, २०१६

**संदर्भ :** १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक डब्ल्यूबीपी -२०१०/(२१८/१०)/ तांशि-२, दिनांक २० एप्रिल, २०११

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण- २०१३/(१२९/१३)/ तांशि-२, दिनांक १३ जानेवारी, २०१६

**प्रस्तावना :**

जागतिक बँक सहाय्यित केंद्र शासनाच्या तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधार कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती या शासकीय संस्था तथा वीरमाता जिजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूट, माटुंगा, मुंबई, इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, माटुंगा, मुंबई व श्री. गुरुगोविंद सिंगजी इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड या अशासकीय पूर्णतः अनुदानित संस्था सहभागी झाल्या आहेत. सदर कार्यक्रमात सहभागी होताना राज्य शासनाने केंद्र शासन व जागतिक बँकेशी केलेल्या करारनामानुसार या संस्थेचे कामकाज नियामक मंडळाद्वारा चालविण्यासाठी संदर्भ क्रमांक - १ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये व्यवस्थापन मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

तथापि, संबंधीत शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाचे पदसिद्ध सदस्य वगळता इतर सदस्याचा नियुक्ती कालावधी २ वर्षांचा असल्याचे नमूद केलेले आहे. त्याअनुषंगाने, सदर कार्यक्रमाच्या पहिल्या व दुस-या टप्प्यात निवड करण्यात आलेल्या काही संस्थांच्या व्यवस्थापन मंडळातील पदसिद्ध सदस्य वगळता इतर सदस्यांचा नियुक्ती कालावधी अनुक्रमे दिनांक २० एप्रिल, २०१३ व २५ एप्रिल,२०१३ रोजी समाप्त झालेला असल्याने संदर्भ क्रमांक २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये सदरच्या संस्थांमध्ये नवीन व्यवस्थापन मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये, शासकिय अभियांत्रिकी महविद्यालय, औरंगाबाद व श्री. गुरुगोविंद सिंगजी इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड या दोन संस्थांची व्यवस्थापन मंडळे बरखास्त करण्यात आलेली असुन या संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाच्या कालावधीस दिनांक १२ जानेवारी, २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, शासकिय अभियांत्रिकी महविद्यालय, औरंगाबाद व श्री. गुरुगोविंद सिंगजी इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड या दोन संस्थेतील व्यवस्थापन मंडळाची पुनर्स्थापना/नव्याने गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यात कार्यरत स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद आणि श्री. गुरुगोविंद सिंगजी इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड या संस्थांमध्ये संदर्भ क्रमांक - २ येथे नमुद केलेला शासन निर्णयान्वये बरखास्त करण्यात आलेली व्यवस्थापन मंडळे शासन निर्णयाच्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ, ब, मध्ये नमुद केल्याप्रमाणे नव्याने स्थापना करण्यात येत आहे.

तसेच, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद आणि श्री. गुरुगोविंद सिंगजी इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड या संस्थांच्या व्यवस्थापन मंडळावरील पदसिद्ध सदस्य वगळता इतर सदस्यांचा नियुक्तीचा कालावधी सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून मोजण्यात येईल आणि सदर सदस्यांचा कालावधी सर्वसाधारणपणे २ वर्षे इतका असेल. तसेच उक्त नमूद केलेल्या संस्थांनी दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी पासून या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत व्यवस्थापन मंडळातील पदसिद्ध सदस्यांनी केलेल्या कार्यवाहीस आवश्यकतेनुरूप शासनाची कार्योत्तर मंजूरी देण्यात येईल.

व्यवस्थापन मंडळांच्या बैठकांसाठी तथा संस्थेच्या निगडीत अन्य कामकाजासाठी व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष तथा सदस्य यांना महाराष्ट्र राज्याच्या सचिव स्तरावरील अधिका-यास देय असणा-या प्रवासाच्या सवलती, प्रवास भत्ता व बैठकभत्ता देय राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९२११५३९१२६४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prakash Bhaskarrao Avhad

Digitally signed by Prakash Bhaskarrao Avhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e09e7338f45626229cb6381e8154da93814d3127e9859a46e544f505defcd004, cn=Prakash Bhaskarrao Avhad
Date: 2016.09.22 16:22:24 +05'30'

**( प्रकाश भा. आव्हाड )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. मा. सचिव, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
७. मा. सचिव, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली.

८. मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.
९. मा.अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
१०.संचालक, राष्ट्रीय परियोजना कार्यान्वयन एकक, एडसिल हाऊस, चतुर्थ तल, १८ अे, सेक्टर १६-ए, नोएडा (उ.प्र)
११.संचालक, अखिल भारतीय तंत्र शिक्षा परिषद, नवी दिल्ली
१२.संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
१४.संचालक, श्री. गुरुगोविंद सिंगजी इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड
१५.प्राचार्य, सर्व शासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये
१६.प्राचार्य, सर्व शासकीय अनुदानित तंत्रनिकेतने
१७.सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण
१८. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
१९.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
२०.महालेखापाल (लेखापरीक्षा ) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
२१.अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/ निवासी लेखा परीक्षा अधिकारी
२२.कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ, लोणेरे
२३.कुलगुरु, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
२४.कुलसचिव,सर्व विद्यापीठे
२५.उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने
२६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई
२७.अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
२८. निवड नस्ती - तांशि-२.

**परिशिष्ट - अ**

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१३/(१२९/१३)/तांशि-२, दि. २१ सप्टेंबर, २०१६ चे सहपत्र

**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद**

**व्यवस्थापन मंडळ**

| | | |
|---|---|---|
| अ. | अध्यक्ष | श्री. विवेक भोसले, |
| ब. | राज्य शासनाव्दारा नियुक्त | १. श्री. रविद्र वैद्य,<br>२. श्री. देवानंद कोटगिरे |
| क. | राज्य शासनाचा प्रतिनिधी | पदसिध्द सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव,<br>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी |
| ड. | विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रतिनिधी | ----- |
| इ | संबंधित विद्यापीठाचा प्रतिनिधी | ------ |
| ई. | शिक्षकांचे प्रतिनिधी | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे सेवाज्येष्ठता विचारात घेउन कमाल दोन या संख्येत मर्यादित |
| फ. | सचिव | पदसिध्द संस्थेचा संचालक/प्राचार्य |

**परिशिष्ट ब**

शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१३/(१२९/१३)/तांशि-२, दि. २१ सप्टेंबर, २०१६ चे सहपत्र

**श्री. गुरुगोविंद सिंगजी इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड**

**व्यवस्थापन मंडळ**

| | | |
|---|---|---|
| अ. | अध्यक्ष | श्री. सुनिल रैथा, |
| ब. | राज्य शासनाव्दारा नियुक्त | १. श्री. मिलींद पोहणेकर<br>२. श्री. त्रिलोकसिंग तारासिंग जबिंदा |
| क. | राज्य शासनाचा प्रतिनिधी | पदसिध्द सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई अथवा त्यांचे प्रतिनिधी |
| ड. | विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रतिनिधी | ------- |
| इ | संबंधित विद्यापीठाचा प्रतिनिधी | ------ |
| ई. | शिक्षकांचे प्रतिनिधी | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे सेवाज्येष्ठता विचारात घेउन कमाल दोन या संख्येत मर्यादित |
| फ. | सचिव | पदसिध्द संस्थेचा संचालक/प्राचार्य |